**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ११ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

- **सर्जनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांचे प्रतिपादन.**
- **विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यावसायिक दृष्टिकोन बाळगून संत्र्याचे एकरी उत्पादन 20 टनाच्या वर जाईल असा संकल्प करण्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन.**
- **थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध अभिवादनपर कार्यक्रम आयोजित.**
- **पूर्व विदर्भात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमानाची शक्यता.**

<u>वेव्हज-अश्विनी वैष्णव/देवेंद्र फडणवीस</u>

सृजनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या या काळात हे स्थान अबाधित राखण्याच्या उद्देशानं वेव्हज २०२५ चं आयोजन मुंबईत होणार असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह वेव्हज उपक्रमाच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. याप्रसंगी मुंबईत स्थापन होणा-या आयआयसीटी या संस्थेची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

***<u>आपने बहोत महत्वपूर्ण संस्था महाराष्ट्र को दी है, जो है (IICT) इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी जशी आहे तशी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव टेक्नॉलजी ही देशातली सगळ्यात प्राइमरी क्रिएटिव टेक्नॉलॉजी संस्था असणार आहेत. आपल्या जे फिल्म सिटी आहे तिथे आपण जागा दिलेली आहेत. यामध्ये केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार आणि सिक्की वगैरेसारखे काही लोकांची एकत्रित येऊन ही संस्था या ठिकाणी उभी करणार आहेत.</u>*** *<u>One Of Its Kind</u>* ***<u>अशा प्रकारची ही अतिशय महत्वाची संस्था ही महाराष्ट्राला दिल्याबद्दल मी माननीय</u>***

***मंत्री महोदयांचे आणि देशाचे प्रधानमंत्री महोदय यांचे आभार मानतो की क्रिएटिव्ह वर्ल्डमध्ये आपण या माध्यमातंन खूप पुढे जाणार आहोत.***

यावेळी महाराष्ट्राच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांच्यात आयआयसीटी मुंबईच्या सामंजस्य कराराच हस्तांतरणही करण्यात आले. वेव्हज ही या क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी परिषद असून जगभरातल्या १०० पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हा कार्यक्रम प्रत्येक वर्षी करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तो मुंबईतच होईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. यासोबतच अश्विनी वैष्णव आणि देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध रेल्वे प्रकल्पांच्या कामाचाही आढावा घेतला. याप्रसंगी  गोंदीया ते बल्लारशहा या रेल्वे लाईनच्या दुपदरीकरणाबाबत तसेच एकुण राज्याला रेल्वे अर्थसंकल्पात मिळणा-या तरतुदीविषयी अश्विनी वैष्णव यांनी सविस्तर सांगितलं....

***हाल ही में हुई अपनी कैबिनेट मीटिंग के दौरान गोंदिया से बल्लारशाह की डबलिंग का 240 किलोमीटर का ये प्रोजेक्ट सेक्शन किया है। 4,819 करोड़ रुपये गोंदिया से बल्लारशाह की डबलिंग से हमारे जो एस्पिरेशनल डिस्ट्रिक्ट्स है और विशेषकर विदर्भ और मराठवाड़ा के।कनेक्टिविटी का इस प्रोजेक्ट से बहुत बड़ा एक इम्पैक्ट पड़ता है। ओवर ऑल महाराष्ट्र से जुड़े हुए प्रोजेक्ट्स जिसमें मैं बुलेट ट्रेन, फ्रन्ट कॉरिडोर और स्टेशन्स का रिडेवलपमेंट। सब मिलाके महाराष्ट्र में रेलवे का इन्वेस्टमेंट अब 1 Lakh 73 Thousand 8 Hundred 4 crore rupees के प्रोजेक्ट्स महाराष्ट्र से जुड़े हुए प्रोजेक्ट्स।***

याप्रसंगी वैष्णव यांनी अमृतभारत स्टेशन योजनेअंतर्गत महाराष्ट्रात सुरू असलेल्या सर्व रेल्वे स्थानकांच्या बांधकामाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. या पत्रकार परिषदेस नागपूरतून दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी सांगितले की चांदा, आमगाव, डोंगरगड, शिवनी तसंच नागपुरातील इतवारी स्टेशनच बांधकाम या योजनेअंतर्गत पूर्ण झालं असून लवकरच त्याच उद्घाटन होणार

आहे. या पत्रकार परिषदेला मध्य रेल्वेचे नागपूर विभागीय व्यवस्थापक अनिल कुमार गर्ग हे देखील उपस्थित होते.

<u>नितीन गडकरी</u>

विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यावसायिक दृष्टिकोन बाळगून गुणवत्तापूर्ण संत्रा उत्पादन करून त्याचे विपणन आधुनिक तंत्रज्ञानाने केल्यास त्यांची आर्थिक भरभराट होईल. इतर शेतकऱ्यांच्या यशोगाथा तसेच नवनवीन प्रयोग यांची माहिती घेऊन संत्र्याचे एकरी उत्पादन 20 टनाच्या वर जाईल असा संकल्प करण्याचं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर इथं केलं. ॲग्रोव्हिजन फाऊंडेशन तर्फे वनामती इथं आयोजित संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यशाळेचं आयोजन आज करण्यात आलं होत त्यावेळी संबोधित करताना ते बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था नागपूरचे संचालक डॉ. दिलीप घोष, राज्यसभा खासदार अनिल बोंडे त्याचप्रमाणे ॲग्रो व्हिजनचे मार्गदर्शक आणि कृषी विज्ञान वैज्ञानिक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ.सी.डी.मायी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना गडकरी यांनी सांगितलं की उत्तम बीज हे फळाच्या वाढीसाठी महत्त्वाचं असून नर्सरी मधून संत्र्याची रोपे ही रोगमुक्त तसेच उत्पादन देणारी असली पाहिजे यासाठी नर्सरी-रोपवाटिकांना अद्यावत करण्याचे आवाहन त्यांनी नर्सरी उत्पादकांना केले. या कार्यशाळेमध्ये विविध तज्ज्ञांनी आपल्या सादरीकरणाद्वारे संत्रा उत्पादकांसाठी बियाण्यांची निवड, फळ लागवड या विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

<u>तहव्वूर राणा</u>

२६-११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याला १८ दिवसांची पोलिस कोठडी पटियाला हाऊस न्यायालयानं दिली आहे. तहव्वूर राणाचं काल भारताकडे प्रत्यार्पण झालं. राष्ट्रीय तपास संस्थेचं पथक काल संध्याकाळी विशेष विमानानं त्याला घेऊन नवी दिल्लीत पोहोचलं. त्यानंतर त्याला पटियाला हाऊस न्यायालयात हजर करण्यात आलं. तहव्वूर राणा याला मुंबई हल्ल्याप्रकरणी २००९ मध्ये अमेरिकेत अटक झाली होती. या हल्ल्याचा सूत्रधार डेव्हिड हेडली याला मदत केल्याचा ठपका त्याच्यावर आहे. राणाचं

प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. एका खासगी वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना अमित शहा म्हणाले....

***भारत की जमीन, भारत का सम्मान और भारत के नागरिक के साथ दुर्व्यवहार भी किया है। वो हमारे कानून के जग में लाना चाहिए और मैं मानता हूँ राणा की यहाँ वापस आना ये मोदी सरकार की कूटनीति का बहुत बड़ी सफलता है.***

महात्मा ज्योतिबा फुले जयंती

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातल्या शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहिल, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या निवासस्थानी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री  एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर संदेशातून महात्मा फुले यांना अभिवादन केलं. देशातली प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी समाजव्यवस्था ही क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाईंची दूरदृष्टी, त्याग आणि परिश्रमांचे फळ आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फुले यांना आदरांजली वाहिली. महात्मा फुले यांच्या 198 व्या जयंतीनिमित्त वाशीम शहरात  भव्य मोटारसायकल सद्भावना रॅली काढण्यात आली.या रॅलीत जय ज्योती, जय क्रांती, क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांचा विजय असो, अशा गगनभेदी घोषणांनी शहर फुलेमय झाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी -उत्तर प्रदेश

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. तीन हजार ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते वाराणसी इथं झालं. थोर

समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त प्रधानमंत्र्यांनी आपल्या भाषणात त्यांचं स्मरण केलं.....

***महात्मा फुले ने भारतीय समाज पर अपना गहरा प्रभाव छोड़ा, भेदभाव और असमानता के खिलाफ बड़ी लड़ाई लड़ी। महात्मा फुले ने बेटियों के बंद शिक्षा के दरवाजों को खोला महात्मा फुले के जीवन से प्रेरणा लेते हुए।मैं सभी माता पिता और अभिभावकों से अनुरोध करता हूँ कि वे बेटियों को जरूर पढ़ाएं। मैं देश के लोगों को महात्मा फुले की जयंती पर बहुत बहुत बधाई देता हूँ।***

<u>हवामान</u>

विदर्भाच्या बहुतांशी जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यात पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा तर पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्ह्याचा समावेश आहे. उद्या देखील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं असा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं दिला आहे. दरम्यान, नागपुरात आज तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होऊ शकते असा अंदाज आहे, तर वर्धा, भंडारा या ठिकाणी सर्वत्र पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात देखील आज विरळ ठिकाणी पाऊस पडू शकतो. आज अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान 43.5 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपूर, अमरावती, चंद्रपूर या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 42 अंश सेल्सिअसच्या पुढे आहे.

******